# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक २०.०८.२०२६ गुरुवार**

**पोलीस भवन, नागपूर शहर येथे सद्भावना दिवस संपन्न :**

दरवर्षी २० ऑगस्ट रोजी भारताचे माजी प्रधानमंत्री स्वर्गीय राजीव गांधी यांचा जन्मदिवस हा सद्भावना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. सद्भावना दिवस साजरा करण्याचा मुख्य उद्येश राष्ट्रीय एकता, शांती प्रेम आणि धार्मिक ऐक्य वाढविणे तथा सर्व धर्म, जातींमध्ये एकोपा वाढविणे हा आहे.

आज दिनांक २०.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. नागपूर शहर पोलीस आयुक्तालयतर्फे पोलीस भवन येथील तळमजला येथे मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे प्रमुख उपस्थितीत सद्भावना दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी सर्व उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मेतची शपथ देण्यात आली. तद्नंतर पोलीस आयुक्त कार्यालय येथील अर्जशाखेत काम करणारे सहायक पोलीस निरीक्षक श्री ज्ञानेश्वर झोल यांचे अकाली निधन झाल्याने मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते त्यांचे छायाचित्राला माल्यार्पण करण्यात आले. सर्व उपस्थीतांनी दोन मिनीटे मौन राहुन श्रध्दांजली अर्पण केली. उपस्थित ईतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी पुष्प अर्पण करुन श्रदांजली दिली. दिवंगत श्री ज्ञानेश्वर झोल यांचेसोबत काम करणारे सहकारी तसेच पोलीस आयुक्त यांचे जनसपंर्क अधिकारी यांनी दिवंगत यांच्या आठवणी व प्रेमळ स्वभाव तसेच कामाप्रति समर्पण याबाबत मनोगत व्यक्त करुन शब्दसुमनांनी श्रध्दांजली अपर्ण केली.

सद्भावना दिवस तसेच श्रदधांजली कार्यक्रमास मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उपआयुक्त, डिटेक्शन, मा. श्री रमेश धुमाळ, पोलीस उपआयुक्त, विशेषशाखा, मा. श्रीमती सुनिता मेश्राम, सहायक पोलीस आयुक्त, मानव संसाधन विभाग तसेच पोलीस आयुक्त कार्यालय येथील सर्व शाखा येथे कार्यरत सर्व पोलीस निरीक्षक, अंमलदार, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच मंत्रालयीन कर्मचारी हजर होते.










**(कामगिरी)**

**<u>१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–</u>**

दिनांक १९.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ११ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण ९,९३६/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०४ केसेसमध्ये ५१ इसमांवर कारवाई करुन ३,०३,१८०/–रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,७१२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८१,९५०/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १९.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २०.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **०४** इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**<u>२) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगीरी :– २४ तासाचे आत चोरीचा गुन्हा उघडकीस. एकुण २७,७८,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त.</u>**

दिनांक १६.०८.२०२६ चे १४.०० वा. ते दिनांक १८.०८.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, क्वॉर्टर क्र. ५३/४, केटीपीएस कॉलनी, कोराडी येथे राहणारे फिर्यादी संजय वामनराव वानखेडे वय ४९ वर्षे यांनी त्यांचे घरी लोखंडी आलमारीत ठेवलेले सोन्याचे वेगवेगळे दागिने दिनांक १६.०८. २०२६ रोजी रात्री २३.०० वा. चेक केले होते. तेव्हा घरी फिर्यादीची पत्नी व त्यांचा पुतण्या नामे शांतनु चंदु वानखेडे वय २२ वर्ष रा. माधान, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती हे घरी होते. दिनांक १७ रोजी फिर्यादी हे घरीच होते. दिनांक १८.०८.२०२६ रोजी पुतण्याला गावी जाण्याकरीता बसस्टॅन्डवर सोडून घरी परत आले व सकाळी १०.०० वा. आलमारीतील दागिने चेक केले असता, सोन्याचे वेगवेगळे दागिने, सोन्याचे बिस्कीट व कॉईन, व चांदीचे भांडे असा मुद्येमाल दिसला नाही. फिर्यादीचा पुतण्या यानेच चोरुन नेला अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे आरोपीविरूध्द कलम ३०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून फिर्यादीचा पुतण्या नामे शांतनु चंदु वानखेडे वय २२ वर्ष त्याचा शोध घेऊन त्यास २४ तासाचे आत ताब्यात घेतले. त्यास चोरीबाबत सखोल विचारपूस केली असता, त्याने वर नमुद चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयातील चोरी गेलेल्या मुद्येमालापैकी २३० ग्राम सोन्याचे दागिने व ०१ मोबाईल

असा एकुण कि. २७,७८,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव कोराडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे, सपोनि. सचिन गायकवाड, पोउपनि. राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा सुनिल यादव, दिनेश महल्ले, चंद्रशेखर भारती, पोअं, निलेश श्रीपात्रे, लक्ष्मीकांत सोनटक्के, हंसराज ठाकुर व मनिष मिश्रा यांनी केली.



**३) गुन्हेशाखा सामजिक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २०.०८.२०२६ चे ००.५४ वा. ते ०४.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभागाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, प्लॉट क्र.०२, सिदधार्थ नगर, टेकानाका, श्री मंगल डेअरी समोर पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे राहणारा आरोपी १) शाहरुख खान वल्द नसरुल्ला खान वय ३० वर्ष हा ईतर ग्राहक आरोपी २) शेख अरमान शेख नसीर वय २० वर्ष रा. मक्का मस्जिदजवळ, टेकानाका, पाचपावली, ३) मोहम्मद समिर वल्द मोहम्मद अंसारी वय २० वर्ष रा. ताजनगर, बडी मस्जिद जवळ, पाचपावली, नागपूर यांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण ३१,०२०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे कलम २७२ भान्यास सहकलम ४,७,८,२०,२१ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनियम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि शिवजी ननवरे व पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**४) कपीलनगर पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २०.०८.२०२६ चे ०६.५० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कपीलनगर येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, सापळा रचून, पोलीस ठाणे हद्दीतील ऑटोमोटीव्ह चौकाकडून कामगार नगर चौकाकडे येणाऱ्या रोडवर, एका काळया रंगाच्या ॲक्टिवा व स्प्लेंडर गाडीजवळील ईसमांना ताब्यात घेऊन पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) प्राची रतन सहारे वय २६ वर्षे, रा. जुना जरीपटका, पाणी टाकीजवळ, नागपूर २) श्रध्दा लेनिन फुडुले वय २८ वर्षे, रा. समतानगर, गली क्र. ९, कपीलनगर, नागपुर ३) नंदु विष्णु हालगोने वय २६ वर्ष रा. प्लॉट क्र. ३२, संतोषनगर, यशोधरानगर, नागपूर ४) चेतन महादेव ढवळे वय ३० वर्ष रा. प्लॉट क्र. ६२४, विनोबा भावे नगर, नागपूर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांची व वाहनाची झडती घेतली असता, आरोपी क्र. १ चे ताब्यात एका झिपलॉक पन्नीत ३.१४० ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०४ मोबाईल, रोख २,०००/— रु. व ॲक्टिवा मोटार सायलक क्र. एमएच ४९ सीई ५१०१, स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एमएच ४९ सीएम ००१५ असा एकुण २,४८,४००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एमडी पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सतिश आडे, पोउपनि रणजीत रननवरे, पोहवा शहजाद शेख व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**मानकापूर पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १९.०८.२०२६ चे २३.४५ वा. चे सुमारास, मानकापूर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, साई किराणा समोर, साईनगर गोधनी रोड, झिंगाबाई टाकळी येथे एक हद्यपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव ललित उर्फ टुन्नी अजय शर्मा वय २८ वर्षे, रा. न्यु लक्ष्मी नगर, हनुमान मंदीरजवळ, झिंगाबाई टाकळी, मानकापूर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा

गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०२ यांचे हद्दपार आदेश क्र. २७९२/२०२६ दिनांक १६.०४.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०६ महिन्याकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे मानकापूर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कळमणा :—** दिनांक १६.०८.२०२६ चे १०.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत नाका क्र. ४, धनोडे आटा चक्कीजवळ, केंद्रेच्या घरी वरच्या माळयावर किरायाने राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती वनिता रामभाऊजी लांजेवार वय ६५ वर्ष या पहिल्या माळयावरुन पायरीवरुन उतरत असतांना, त्यांचा तोल गेल्याने खाली पडल्याने गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, ट्रॉमा सेंटर येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक १९.०८.२०२६ चे १८.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि प्रमोद ढोबळे ७७२१०७९७४९ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**